# समिती दर्पण

**डिसेंबर २०२३**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www. samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉक्टर अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृह आहेत. त्यात ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा त्रिसूत्री वर समितीचे काम चालते.

# ‘आता आम्ही उद्योजकच होणार!’

## यशस्वितांचे मार्गदर्शन, अनुभवकथनामुळे मानस झाला अधिक दृढ






आधुनिक तंत्रज्ञानामुळे बहुतांश क्षेत्रात होत असलेली मनुष्यबळाची कपात लक्षात घेता नोकरी मागणारे नव्हे, तर नोकरी देणारे व्हा, असे आजच्या तरुणाईला वेळोवेळी सांगितले जाते, मात्र नोकरी देणारे होण्यासाठी नेमके काय केले पाहिजे, या प्रश्नाचे उत्तर समितीतील उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळाले. निमित्त होते उद्योजकता विकास केंद्रातर्फे २४ डिसेंबरला आयोजित केलेल्या उद्योजकता परिषदेचे.

ज्यांनी शुन्यातून सुरुवात करून जागतिक पातळीवर आपल्या कामाचा ठसा उमटवला असे तीन मराठी उद्योजक या परिषदेला उपस्थित होते. देशातून सर्वाधिक द्राक्षनिर्यात करणारी शेतकरी उत्पादक कंपनी सह्याद्री फार्मचे विलास शिंदे, जगभरात विश्वासार्ह असणाऱ्या मार्क लॅब्ज या साखरेतील घटकांचे विश्लेषण करणाऱ्या कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक डॉ. वसुधा केसकर, दास ऑफशोअर कंपनीचे संस्थापक अशोक खाडे यांनी आपल्या यशस्वी उद्योगाचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. सामान्य कुटुंबातून आलेल्या, उद्योगाची कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना, स्वतःच्या हिमतीवर, मोठ्या संघर्षातून, प्रसंगी अनेक विरोधांना तोंड देत यशस्वी झालेल्या या तिघांचे अनुभवकथन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी तसेच त्यांच्या मनातील उद्योजक होण्याची इच्छा अधिक दृढ करणारे ठरले.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार होते. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी प्रास्ताविकात परिषदेच्या आयोजनामागचा उद्देश स्पष्ट केला. उद्योजकता विकास केंद्राचे प्रमुख सुरेश उमाप यांनी केंद्राच्या कामाचा आढावा घेतला. समितीचे कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव, विश्वस्त तुकाराम गायकवाड, डॉ. ज्योती गोगटे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विश्वस्त मकरंद फडके, संजय अमृते, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, सुप्रिया केळवकर आदी उपस्थित होते. विश्वस्त रत्नाकर मते यांनी आभार मानले. पर्सिस्टंट कंपनीच्या देवांश मेहता सभागृहात झालेल्या या मेळाव्याला उद्योजक माजी विद्यार्थी तसेच उद्योजक होऊ इच्छिणारे आजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उद्योजक माजी विद्यार्थ्यांचे अनुभवाचे बोल



उद्योजक म्हणून यशस्वी झालेले समितीचे माजी विद्यार्थी नवनाथ जगताप, सुरज कुलकर्णी, रणजित खळदकर, ओंकार अरगडे, राणी सुतार, कीर्ती हसे यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उद्योजक म्हणून वाटचाल करताना समितीतील शिस्त आणि संस्कारांचा पदोपदी कसा उपयोग झाला, हे या साऱ्यांनी आवर्जून नमूद केले. कामाशी प्रामाणिक राहा, अभ्यास करा, अनुभव घ्या आणि मुख्य म्हणजे समितीतील मित्रांच्या संपर्कात राहा, एकमेकांना सहकार्य करा, असा सल्ला यावेळी या युवा उद्योजकांनी विद्यार्थ्यांना दिला. साक्षी वाळके, अजय पठाडे यांनी या माजी विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली.

### सुरज कुलकर्णी यांना बीजभांडवल

माजी विद्यार्थ्यांना उद्योगासाठी प्रोत्साहन देण्याकरता समितीच्या वतीने बीजभांडवल दिले जाते. मशरुम उत्पादन आणि विक्रीचा व्यवसाय करणारे सुरज कुलकर्णी यांना यावेळी बीजभांडवलाच्या रकमेचा धनादेश देण्यात आला. दरम्यान, गेल्यावर्षी ग्लोरी स्पोर्टस् या दुकानाचे मालक रणजित खळदकर यांना समितीने बीजभांडवल दिले होते. व्यवसायवृद्धीसाठी या मदतीचा मोठा उपयोग झाल्याचे सांगत समितीविषयी कृतज्ञता व्यक्त करून खळदकर यांनी त्यातील काही रक्कम समितीला परत केली.

“ उत्पादकता, गुणवत्ता, खर्च कमी हे व्यवसायाचे सूत्र आहे, जे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साधता येईल. अडचणी हेच भांडवल असते, ते संकट मानू नका, संधी माना. शोध घ्या, शिकायची तयारी ठेवा, तुम्हाला उद्योग सापडतील. उद्योग करण्यासाठी वयाचे बंधन नसते, मात्र त्यासाठी कायम स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक असते.

- **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती

“ चांगले काम केले तर तुम्हाला आदर मिळतो, मग ती स्त्री असो वा पुरुष. कोणत्याही क्षेत्रात काम करताना अडचणी आल्या, विरोध झाला तरी भिऊ नका. प्रयत्न करत राहा. ग्राहकांकडून येणाऱ्या तक्रारींचे स्वागत करा. कारण त्यातूनच तुम्ही व्यवसायात सुधारणा करून पुढे जाता.

- **डॉ. वसुधा केसकर,** शास्त्रज्ञ, व्यवस्थापकीय संचालक, मार्क लॅब्ज

“ ग्रामीण भागात उद्योगाच्या मोठ्या संधी आहेत. शेतीकडे उद्योग म्हणून पाहा. उत्पादनाबरोबरच विक्रीचे सूत्र समजून घ्या. कार्यक्षम मनुष्यबळ निवडा. ग्राहकांशी प्रामाणिक राहा.

- **विलास शिंदे,** सह्याद्री फार्म

“ उद्योग सुरू करण्यापूर्वी त्याची माहिती, अनुभव घ्या. त्यातून आपल्या क्षमता, धोके आणि संधी यांचा अभ्यास करा. गुणवत्ता, दूरदृष्टी, योग्य नियोजन असल्यास यश निश्चित मिळेल.

- **अशोक खाडे,** दास ऑफशोअर

“ नोकरीतील सुरक्षितता उद्योगात नसते. त्यामुळे मुलाने उद्योजक व्हावे, याबाबत पालकांची भूमिका सकारात्मक नसते. त्यामुळे समितीने त्यांचेही समुपदेशन करावे.

- **भाऊसाहेब जाधव,** कायम विश्वस्त, विद्यार्थी साहाय्यक समिती

## परदेशस्थ समितीमित्रांचा रंगला मेळावा

अनेक परदेशस्थ भारतीय डिसेंबरमध्ये सुटी घेऊन भारतात कुटुंबीयांच्या भेटीसाठी येतात. त्यांना एकत्रितपणे समितीत बोलावून समितीच्या विविध उपक्रमांची माहिती देण्याच्या उद्देशाने १९ डिसेंबर रोजी प्रवासी भारतीय दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने आपटे वसतिगृहात परदेशस्थ समितीमित्रांना मेळावा रंगला. समितीचे विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी जुलै २०२३ मध्ये केलेल्या अमेरिका दौऱ्यात समितीच्या कामाची माहिती तेथील भारतीयांपर्यंत पोचविली. ती माहिती ऐकून प्रभावित झालेले अनेक जण समितीच्या उपक्रमांमध्ये सहभागी झाले, काहींनी तशी तयारी दर्शविली. भारतात आल्यानंतर समितीला आवर्जून भेट देणार असल्याचे सांगितले. डिसेंबरमध्ये सुटीसाठी आलेल्या परदेशस्थ समितीमित्रांना एकत्र आणून समितीची तसेच समितीच्या उपक्रमांची ओळख करून देण्याच्या हेतूने प्रवासी भारतीय दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात विविध देशांमध्ये सध्या वास्तव्य असलेले हिमांशू भट, मीनल रेणावीकर, अमित केळवकर, केतन खंडकर, शिरीष खंडकर, रश्मी बडवे, नेहा खंडकर, दीपाली कुलकर्णी आदी सहभागी झाले होते. परदेशातील भारतीयांसाठी समितीमित्र ही संकल्पना राबवून त्या माध्यमातून त्यांना समितीच्या उपक्रमाशी जोडण्याचा प्रयत्न असल्याचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी प्रास्ताविकात सांगितले. विश्वस्त डॉ. मकरंद फडके यांनी समितीच्या नवीन प्रकल्पांची माहिती दिली. श्रीधर कुलकर्णी यांनी कमवा- शिका योजनेविषयी तर दिनकर वैद्य यांनी पाल्य- पालक योजनेविषयी सांगितले.



विद्यार्थी विकास केंद्राच्या विविध उपक्रमांविषयी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी तर प्रवेश प्रक्रियेविषयी विश्वस्त संजय अमृते यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया केळवकर यांनी केले.

### खंडकर कुटुंबीयांकडून देणगी

समितीच्या कोणत्याही अडचणीत धावून येणारे देणगीदार विनायक खंडकर यांच्या कुटुंबीयांच्या वतीने यावेळी समितीला दोन लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. विनायक खंडकर यांचे चिरंजीव शिरीष व केतन यांनी हा धनादेश कार्यकारी विश्वस्त श्री. तुषार रंजनकर यांच्याकडे सुपूर्त केला.

## वार्षिक दिनदर्शिका प्रकाशित

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन उद्योजकता परिषदेत मान्यवरांच्या हस्ते झाले. यात इंग्रजी महिने, तारखा, मराठी महिने, तिथी, सणवार, महत्त्वाच्या व्यक्तींचे वाढदिवस, जयंती- पुण्यतिथी याबरोबरच दिनदर्शिकेच्या मागील पानांवर समितीच्या विविध उपक्रमांची माहिती आहे. या दिनदर्शिकेच्या ग्लेझ्ड पेपरवर पाच हजार प्रती छापण्यात आल्या असून त्याचा खर्च जाहिरातींच्या उत्पन्नातून करण्यात आला आहे. समितीचे साहाय्यदाते, समितीशी संबंधित सर्व घटक, माजी व आजी विद्यार्थी यांना ही दिनदर्शिका भेट स्वरुपात देण्यात येत आहे.





**समितीचे देणगीदार, हितचिंतक, विद्यार्थी, त्यांचे पालक यांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

**- समिती परिवार**

**2024**

## मनोगत

# On the top of Mount Fuji



**समितीने विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रांमधील संधींची कवाडे खुली केली आहेत. अनेक विद्यार्थी या संधींचे सोने करत भरारी घेत आहेत. समितीतील विद्यार्थी नागेश पंचलिंग जपानी भाषा शिकला आणि शिक्षण सुरू असतानाच त्याला जपानमधील एका कंपनीत नोकरी मिळाली. समितीत वास्तव्यात असताना परदेशात नोकरी मिळविणारा तो समितीचा पहिला विद्यार्थी ठरला आहे. त्याचा अनुभव त्याच्याच शब्दांत...**

On December 20, 2023, I received a job offer from the company Daifuku. During the lockdown, I decided to embark on a journey to learn a new language, and today, I have received a job offer from the company. From someone who loves Japanese culture and Japan to landing a job there, I believe I have completed one step in the journey. Getting the job is a big deal – a major step! This month, I had the opportunity to travel to Japan for a job interview, where Daifuku extended a job offer to me. In this journey, Fast Offer Japan and Hirameki have been very helpful to me.

Although not specifically in bullet trains, robotics, or other world-class technologies, what strikes me about Japan is the unique blend they create, not just in cutting-edge technology but also in values like cleanliness, discipline, respect for others, and a genuine love for their work.

After joining the Vidyarthi Sahayak Samiti, the Samiti family, and executive trustee Tushar Ranjankar Sir have been consistently supportive. Additionally, the Samiti provided me with the opportunity to teach Japanese to fellow students, helping me improve myself.

From my experience, I will say every student should have a goal in life, but not only be goal - oriented; they should also focus on the process. As there is a Japanese saying, 'Ichi go ichi e,' meaning live in the moment, you should enjoy every moment in the process as your goal is the endpoint of the journey. So, you should be able to enjoy the journey because there is nothing ahead of the goal to enjoy after reaching it.

If you are determined about your goal, you automatically get help from friends and teachers, a good environment that helps you reach that goal, making any goal possible. With this job offer, I feel like reaching the top of Mount Fuji. But, as the saying goes, 'Mada mada desu,' there's still much more to come in this exciting journey!

-Nagesh Panchling

## शिंपल्यातील मोती

# समितीमुळे मिळाला जीवनाला 'अर्थ'

मी लहान असताना म्हणजे दुसरीत असताना माझ्यावरील आईवडिलांचे छत्र हरपले. मला मोठ्या दोन बहिणी आहेत. आईवडिल नसल्याने माझ्या काकांनी आम्हा तिन्ही भावंडांना बालसुधारगृहामध्ये टाकले. तेथे मी इयत्ता पाचवीपर्यंत शिक्षण घेतले. मला मार्क चांगले मिळत असल्याने व मी वर्गात कायम पहिला येत असल्याने पाचवीनंतर मला नाशिकला पुणे विद्यार्थी गृह या वसतिगृहात शिक्षणासाठी पाठविले. त्यानंतर आठवीत मी पुन्हा शिक्षणासाठी बालसुधारगृहात आलो. तेथे दहावीपर्यंत शिक्षण घेतले.



दहावीत मी शाळेत प्रथम क्रमांक मिळविला. मात्र बालसुधारगृहात दहावीपर्यंतच शिक्षण होते. पुढचे शिक्षण मिळणार नव्हते. दहावीच्या निकालानंतर शाळेतून फोन आला की मी शाळेत पहिला आलो. पण तरीही मी खूश नव्हतो कारण मला परिस्थितीमुळे पुढचे शिक्षण घेता येणार नव्हते. अशा परिस्थितीत आमच्या शाळेतील विज्ञान विषय़ाच्या शिक्षिका नीता गुळवणी मला आईसारख्या भेटल्या. त्यांनी मोठा आधार दिला. माझी सारी व्यथा ऐकल्यानंतर त्यांनी माझ्या पुढील शिक्षणाचा तसेच राहण्याचा खर्च करण्याचे ठरविले. गुळवणी मॅडम यांच्या मदतीमुळेच मला विद्यार्थी साहाय्यक समितीत प्रवेश मिळाला आणि गरवारे कॉलेजमध्ये माझे शिक्षण चालू झाले. कॉलेजमध्ये मी एनसीसीचे प्रशिक्षणही घेतले. विद्यार्थी साहाय्यक समिती ही माझ्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. समितीतील वास्तव्यात माझ्या जीवनाला खरा अर्थ मिळाला. तेथील विद्यार्थी विकास केंद्राचे उपक्रम, कमवा- शिका योजना या गोष्टींचा मला खूप फायदा झाला. समितीत राहूनच मी बँकिंग आणि फायनान्स हे विषय घेऊन बी.कॉम. पदवी घेतली. आज मी एका नामांकित बँकेत डेप्युटी मॅनेजर पदावर कार्यरत आहे. या साऱ्याचे श्रेय मी मला आईप्रमाणे आधार देणाऱ्या नीता गुळवणीमॅडम आणि विद्यार्थी साहाय्यक समितीला देईन.

आपण समाजाचे देणे लागतो, ही शिकवण मला समितीतच मिळाली. त्यामुळे कोरोना काळात मी अनाथाश्रमांमध्ये अन्नदान केले. भविष्यात समितीचे संस्कार आणि गुळवणीमॅडम यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून अनाथ मुलांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा मानस आहे.

**- दिनेश बाळू शेलार,** माजी विद्यार्थी




*समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्या संकल्पनेतून गुणवंत विद्यार्थी सन्मान हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. चार तास काम, योगासने, पाल्य- पालक योजना, विद्यार्थी विकास केंद्र अशा सर्व उपक्रमांमध्ये प्रामाणिकपणे सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला जातो. या आदर्श विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देऊन गौरविण्यात येते. अशा पद्धतीने निवड झालेल्या आदर्श विद्यार्थ्यांचा सन्मान उद्योजकता परिषदेत समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते करण्यात आला. श्री. पवार यांनी या नवीन उपक्रमाचे कौतुक केले.*





# इपिरॉकच्या अधिकाऱ्यांची नवीन प्रकल्पाला भेट

इपिरॉक (Epiroc) कंपनीच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थी साहाय्यक समितीला भेट दिली. कंपनीच्या मनुष्यबळ विभागाचे सिनिअऱ व्हाईस प्रेसिडेंट नदीम पेन्सर, मॅनेजिंग डायरेक्टर मंडी चे, सीएफओ सपना पुरस्वानी, ह्युमन रिसोर्सेस मॅनेजर धर्मेश मेहता, ब्रँडिंग अँड कम्युनिकेशन मॅनेजर चंदना मुंग्रे, कॉर्पोरेट सोशल रिस्पोन्सिबिलिटी ऑफिसर धनाजी पुरी यांचा त्यात समावेश होता.

लजपत भवन संकुलाच्या प्रांगणात सुरू असलेल्या मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामाची त्यांनी पाहणी केली. तेथे वृक्षारोपणही केले. इपिरॉक कंपनीने समितीच्या नवीन प्रकल्पांना सीएसआरअंतर्गत मोठे अर्थसाह्य केले आहे.



# महोत्सवाच्या निमित्ताने मिळाली पुस्तकांची भेट

पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात १६ ते २४ डिसेंबर दरम्यान पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला. यामध्ये विविध भाषांतील, विविध लेखकांची, विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध होती. त्याचबरोबर संस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन केले होते. समितीतील दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या दिवशी या महोत्सवाला भेट दिली. त्या ठिकाणी झालेले सांस्कृतिक कार्यक्रम तसेच व्याख्यानांचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.

समितीच्या हितचिंतक सौ. शुभांगी कोपरकर यांनी या महोत्सवातील प्रदर्शनातून समितीतील विद्यार्थ्यांसाठी अनेक पुस्तके खरेदी केली. त्यात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तके आहेत. विविध प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील लेखकांचे साहित्य यात समाविष्ट आहे. काही अनुवादित पुस्तके आहेत. सामजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध विषयांवरील पुस्तकांचा त्यात समावेश आहे. उद्योग, पैसा व्यवस्थापन, नेतृत्व अशा मानवी जीवनातील मूलभूत विषयांबरोबरच पर्यटनविषयक तसेच प्रवासवर्णनेही आहेत. यातील 'महासम्राट' या शिवाजीमहाराजांच्या जीवनावरील कादंबरीचे दोन खंड तर विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच आहेत. यातील अनेक पुस्तके मुलांनी सुचवलेली आहेत.

## आवर्जून वाचावे असे काही

### १. वर्किंग ऑन द एज

प्रसाद नित्के यांचे हे पुस्तक म्हणजे कोलंबस, अमेरिगो वेस्पुसी यांच्या शोध मोहिमेइतकेच थरारक आहे. सह्याद्रीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत एकट्याने प्रवास करणे, हे दिव्य लेखकाने केले आहे.

### २. शहीद भगतसिंग यांची जेल डायरी

शाहिद भगतसिंह यांची जेल डायरी म्हणजे या महान युगपुरुषाचे भारतीय जनमानसाला लाभलेले एक वरदान आहे. प्रचंड वाचन आणि त्यानंतर आपले मत प्रकटन हे याचे वैशिष्ट्य आहे.

### ३. महासम्राट

ही कादंबरी म्हणजे विश्वास पाटलांच्या लेखणीतून अवतरलेली शिवछत्रपतींची जीवनगाथा आहे. दोन खंडांमध्ये उपलब्ध असलेले हे उत्कृष्ट लिखाण आहे.

### ४. पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय

एका सनदी अधिकाऱ्याच्या दृष्टिकोनातून स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास या पुस्तकात वाचायला मिळतो. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांची जनतेप्रती असलेले उत्तरदायित्व आणि भारतातील काही मोजक्या क्षेत्रांचा आढावा लेखक बी. जी. देशमुख यांनी घेतलेला आहे.